# प्रकरण तिसरे

# 'मुंबई दिनांक' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण

## ▪ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' या कादंबरी मधील पत्रकारितेच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक , अवैध धंदे, स्मगलिंग, तसेच मुंबईतील समाजजीवन यांचा परिचय करून घ्यावयाचा आहे. या कादंबरीच्या अनुषंगाने वृत्तपत्र व्यवसाय, त्यातील पत्रकार व्यक्तिरेखा, तसेच इतर व्यक्तिरेखा, पत्रकार व्यक्तिरेखेचे विशेष तसेच महानगरीय कादंबरीचे विशेष इ. बाबींचे तपशीलवार विवेचन करणे अभिप्रेत आहे.

## १. 'मुंबई दिनांक' – महानगरीय कादंबरी

१९६० नंतर मराठी साहित्य विविध अंगांनी संपन्न होऊ लागले. मराठी कादंबरी बदलू लागली. तिच्यात अनेक विविध जीवन प्रवाहांचे चित्रण होऊ लागले. त्यातील एक प्रवाह म्हणजे महानगरीय जीवनाचे चित्रण होय. महानगरीय जीवन म्हणजे मध्यमवर्गीय जीवनाचं वास्तव दर्शन हा एक चुकीचा समज याच काळात निर्माण झाला होता. पण महानगरात केवळ मध्यमवर्गीय असतात असे नाही तर महानगरीय जीवन बहुरंगी स्वरूपाचे असते. वैज्ञानिक व औद्योगिक क्रांतीने मानवी जीवनात आमुलाग्र बदल घडून आले. कामधंद्यानिमित्त खेड्यातला माणूस शहराकडे धाव घेऊ लागला. खेडी ओस पडू लागली. पूर्वीच्या काळात शहरे ही व्यापार उदिमांची महत्त्वाची ठिकाणे असत. ती शहरे आज धर्मसत्ता, केंद्रसत्ता, औद्योगिक केंद्रे बनली आहेत. त्यामुळे त्या शहरात भांडवलदार आहेत तसेच कामगारही आहेत. आर्थिक प्राप्तीचे केंद्र म्हणून शहरांना महत्त्व

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

प्राप्त झाले. भांडवलशाहीमुळे परंपरागत व्यवसाय बुडालेले अनेकजण उपजीविकेसाठी शहराकडे धावले. कष्टकरी, नशीब अजमावण्यासाठी अनेकजण खेडी सोडून शहरात आले. व्यवसायानिमित्त परप्रांतीय पाय टाकू लागले. नैसर्गिक, राजकीय, सामाजिक आपत्तीमुळे अनेकजण आपला प्रदेश सोडून शहरात येऊन राहू लागले. साहजिकच शहरात माणसांची, संस्कृतीची, विविध भाषिकांची गर्दी झाली. या विविधतेतूनच शहराची एक स्वतंत्र संस्कृती तयार होऊ लागली. शहरात माणसाची गर्दी वाढली पण त्यात माणसाचे माणूसपण हरवले. माणसाचे माणसाशी असणारे संबंध तात्पूरत्या स्वरूपाचे तयार झाले. माणूस समुहात राहुनही त्याच्या वाट्याला एकाकी जीवन आले. शहरात स्पर्धा वाढू लागली. त्यामुळे पैशाला अवास्तव स्वरूप प्राप्त झाले.

शहरातला माणूस ठराविक वर्गातलाच राहिला नाही तर तिथे जसा सुखलोलुप माणूस पाहायला मिळतो तसा जगण्यासाठी चिवट झूंज देणारा माणूसही भेटतो. कष्ट करून जीवन जगणारा माणूस आहे, तसा भोगवादी, चंगळवादी जीवन जगणारा माणूसही पहायला मिळतो. एकुणच शहरात सुखसमृद्धीत लोळणारा माणूस, मध्यम वर्गीय आयुष्य जगणारा माणूस, त्याचप्रमाणे दोनवेळच्या अन्नालाही महाग बनलेला उपासीपोटी माणूस दिसतो. शहरात सुंदर सिमेंटच्या इमारती दिसतात. तिथे सुंदर स्वच्छ पोशाखातली मुले, मुली, माणसे दिसतात. त्याचप्रमाणे झोपडपट्टीत घाणीच्या साम्राज्यात वाढणाऱ्या संस्कृती, घाणेरड्या बकाळ संस्कृतीतील माणूस, त्याची उघडी नागडी मुले आपल्या नजरेत भरतात. छोट्याशा जागेत भाऊगर्दीत वाढणाऱ्या संस्कृतीत कामासक्त प्रवृत्ती, रोगट मानसिकता आणि ताणतणावाचे दर्शन घडते. अशा शहरातल्या समुहात राहुनही एकाकी बनलेल्या, माणूसपणाचा चेहरा हरवून बसलेल्या माणसाचे उद्योगही तितकेच पहायला मिळतात. खून, मारामाऱ्या, गुन्हेगारी, चोर, लुटारू, काळेधंदे, वेश्याव्यवसाय इ. चे साम्राज्य रोज नव्या समस्या निर्माण करतात. त्या समस्येचे चित्रण मराठी कादंबरीतून होणे स्वाभाविक आहे.

१९६० नंतर महानगरीय जीवन चित्रण करणाऱ्या अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्यातील बहुतांश कादंबऱ्या ह्या मुंबई शहराचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. उदा. जयवंत दळवी यांची 'चक्र' (१९६३), मनोहर शहाणे यांची 'धाकटे आकाश' (१९६३), 'पुत्र' (१९७१), शंकरराव खरातांची 'हातभट्टी'(१९७०), प्रभाकर पेंढारकरांची 'अरे संसार संसार'(१९७१), अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' (१९७२), सुभाष शेंडे यांची 'अंधारवाटा' (१९७८) इत्यादी.

## २. 'मुंबई दिनांक' या कादंबरीतील आशयसूत्रे

'मुंबई दिनांक' ही अरुण साधू यांची पहिली कादंबरी होय. ही कादंबरी १९७२ मध्ये प्रकाशित झाली. 'मुंबई दिनांक' ही आगळी-वेगळी राजकीय कादंबरी जेव्हा प्रसिद्ध झाली तेव्हा या कादंबरीच्या विषयाचे वाचकांनी प्रचंड स्वागत केले. स्वत: लेखक अरुण साधू हे वृत्तपत्र विभागातील जाणकार असल्याने व पत्रकारितेचा समृद्ध अनुभव त्यांच्या पाठीशी असल्यामुळे या कादंबरीवर उलटसुलट चर्चा झाली. अरुण साधू यांनी वेगवेगळ्या व्यक्तिचित्रणातून महानगरी असणाऱ्या मुंबईतील जनजीवनाचे विस्तारपूर्वक चित्रण केले आहे. मुंबई हे महानगर उद्योगधंद्यानी गजबजलेले असल्यामुळे रोजगारासाठी माणसांचा लोंढा सतत वाहत असतो. मुंबईचे जनजीवन, तेथील धावपळ, तेथील माणसांचे स्वभाव, त्यांची जीवनशैली, राग, द्वेष, लोभ या साऱ्या गोष्टीचे दर्शन इथे आपणाला घडते. अत्यंत श्रीमंतीत वाढणारी माणसे आणि अत्यंत दरिद्री माणसे इथे एकाच वेळी दिसतात. फोर्टमधील ओबेरॉय, ताजमहाल या पंचतारांकित हॉटेलच्या गगनचुंबी इमारती इथे आहेत. धारावी ही आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टीही इथेच आहे. साऱ्या जगाला जाग येते ती पक्षांच्या किलबिलाटाने पण मुंबईला जाग यायला मुंबई झोपत नाही. रात्रभर मुंबई जागीच असते. लोकल्स, टॅक्सी, हॉटेल्स, बार या गोष्टी पहाटे तीनपर्यंत सुरू असतात. फक्त दिवसाच्या मानाने गर्दी कमी असते. अशा

या मुंबईचे वास्तव दर्शन घडते. अरुण साधूंनी मुंबईतल्या पहाटेचे वर्णन कसे केले आहे ते पाहा - ''पहाटे पाच, मुंबई आता हलके हलके आळसावत झोपेतून जागी होऊ लागली आहे, लोकल्स धावू लागल्या आहेत. डबल डेकर्सही रस्त्यावरून भयाण आवाज करीत फिरू लागल्या आहेत. सगळी मुंबई अजून जागी झाली नाही. पण हलके हलके जाग येते आहे. लोकल्सची स्टेशनं मात्र पूर्ण जागी झाली आहेत. तिथे आता माणसाची गर्दीही दिसू लागली आहे. वर्तमानपत्रांचे गठ्ठे घेतलेली मुले, दुधवाले, भाजीवाले, फेरीवाले, रात्रपाळ्यांचे कामगार आणि रात्री फर्स्ट क्लासमध्ये बसायची भीती वाटणारे काही ऑफीसर्स यांची आता लोकलमध्ये धमाल आहे. शहर जागे झाले नसेल पण दूरच्या उपनगरातील घरे केव्हाच जागी झाली आहेत. नोकऱ्या करणाऱ्या बायांची अंगधुणी, स्वयंपाक चालू आहेत. पुरूषांच्या दाढ्या, ज्यांच्या ड्युटीज लवकर आहेत त्यांना भराभर सारं आटोपून तासादीडतासात दोन तासात आपली नेमकी गाडी पकडावी लागेल म्हणून त्यांची धावपळ चालू आहे. दुधाच्या गाड्यांचे आवाज येताहेत. मुंबई जागी होते आहे. काळोखाची शाल हळूहळू अलगद बाजूला सारते आहे. पण गिरण्यांच्या, कारखान्यांच्या, बोटींच्या, बसेसच्या चिमण्यांमधून निघालेल्या धुरकट धुक्यात मात्र मुंबई अजून लपेटलेली दिसते आहे. कफ परेड, मरीन ड्राइव्ह, बीच कँडी, शिवाजी पार्क, बँड स्टँड, जुहू वगैरे ठिकाणी समुद्राकाठाच्या पहाटेची खरी शीतलता आता जाणवते आहे. पण गिरगाव, कुंभारवाडा, नागपाडा, भायखळा, परळ, लालबाग, दादर, कुर्ला, विक्रोळी, अंधेरी अशा इतर दाट वस्त्यांमध्ये मुंबइची तीच धुरकट, मरगळलेली, कोमेजलेली पहाट फुटते आहे. झोपडपट्ट्यांतल्या बाया आणि पुरूष वेगवेगळ्या ठिकाणी हाती पाण्यानं भरलेली डबडी घेऊन बसताहेत, रेल्वे रुळांच्या बाजूला मोकळ्या मैदानामध्ये, एकमेकांकडे पाठ करून उभ्या असलेल्या इमारतीच्या मधल्या जागेत, हौसिंग बोर्डाच्या कॉलनीच्या मोकळ्या जागांमध्ये त्यांचे विधी चालू आहेत. लोक पूर्ण उठायच्या आत

त्यांना विधी संपवायचे आहेत आणि आता तर हळूहळू सगळीकडेच जाग येऊ लागली आहे. मुंबई जागी होत आहे.''[१] या संपूर्ण कादंबरीमध्ये मुंबई महानगरीचे अत्यंत बारकाव्यासह वर्णन झालेले आहे. मुंबईसारख्या महानगरीय जीवन जाणिवा, सुख दु:खाचे अस्तित्वाचे चित्रण मराठी साहित्यात कमी झाले आहे याची उणीव अरुण साधूंनी या कादंबरीच्या आधारे भरून काढली आहे.

मुंबई नगरीत पोटापाण्याचा व्यवसाय शोधण्यासाठी अनेक राज्यातून माणसे आलेली आहेत. आपल्या कलेला वाव मिळावा म्हणून अनेक कलावंत मंडळी मुंबईत आलेली आहेत. इथे येणारा प्रत्येक माणूस मुंबईच्या प्रेमात पडतो. तो मुंबईतल्या गर्दीला वैतागतो पण सवय झाल्यावर तो गर्दीशिवाय जगू शकत नाही. इथल्या अय्यरला मुंबईविषयी आपलेपणा वाटतो. त्याला मद्रास व बंगलोरविषयी काडीचंही प्रेम नाही. मुंबईतील सर्वसामान्य माणसाचं जीवन इथे किशोरवझेच्या रूपानं साकारले आहे. तो मुंबईतला यंत्रवत जीवनाला कंटाळला आहे. गर्दीत त्याचा जीव घुसमटतो आहे त्याच्या मनासारखं काहीच घडत नाही. रोज रोज पराभवाची सकाळ का उजाडते? हा त्याला रोज पडणारा प्रश्न आहे. परंतु त्याला मुंबई सोडावीशी वाटत नाही. याविषयी अरुण साधू लिहितात की, ''माणूस कितीही उदास असला, विफलतेच्या अंतिम टोकावर जाऊन पोचला तरी त्याला पुन्हा तरतरी येते. थोडी आजुबाजूला नजर टाकली की त्याला आपल्यापेक्षाही खालच्या पातळीवर निकृष्ट जीवन जगणारी माणसं दिसतात. मग त्याला आपली दु:ख, आपलं दारिद्र्य काहीच नाही असं वाटू लागतं. किंबहुना त्या दु:खाविषयी वा दारिद्र्याविषयी बोलणंही त्याला हास्यास्पद वाटू लागतं. म्हणूनच मुंबई आपल्याला ग्रेट वाटते. मुंबई सोडावीशी वाटत नाही. मुंबईचे अनेक परस्पर – विरोधी गुण आहेत. मुंबईत आला की माणूस वैतागतो. मुंबईची गर्दी अंगावर भीतीने काटा आणते. पण त्याचबरोबर ती स्वत:ला विसरायलाही लावते. एकाच क्षणी मुंबई आवडते आणि

दुसऱ्याच क्षणी तिचा तिटकाराही वाटू लागतो. अनेक गोष्टी आजूबाजूला असतात. कशातही मन गुंतवता येतं. काय करायचं हा प्रश्न कधी पडत नाही. आयुष्य कसं भराभर निघून जातं. विचार करायला सहसा वेळ मिळतच नाही. म्हणून मुंबई प्रत्येकाला आपली वाटते. प्रत्येकाची स्वत:ची मुंबई. भिकाऱ्याची मुंबई, मंत्र्याची मुंबई, चोरांची मुंबई, राजे महाराजांची मुंबई, स्मग्लर्सची मुंबई, कारकुनांची मुंबई, नट नट्यांची मुंबई, बेकारांची मुंबई आणि या साऱ्यांना मुंबई पुरून उरते.''[२] अशा या मुंबईमध्ये प्रत्येकाला आधार मिळतो.

मुंबई ही उद्योग नगरी आहे. अनेक उद्योगधंद्याची रेलचेल इथे आहे. उदा. कारखानदारी, वृत्तपत्र व्यवसाय, सेवा उद्योग इ. महाराष्ट्राची राजधानी असल्यामुळे राकारणाची सूत्रे इथून हलवली जातात. त्यामुळे मुंबईत विविध नेत्यांची, पुढाऱ्यांची वर्दळ असते. मुंबईत चांगल्या गोष्टीबरोबर वाईट गोष्टीही चालतात. अवैध धंदेही मुंबईत राजरोसपणे चालले जातात. स्मगलिंग चे तर मुंबई हे केंद्रच आहे. त्याचबरोबर जुगार, दारू, वेश्याव्यवसाय असे काळे धंदे सर्रासपणे चालतात. अरुण साधूंनी बारीक-बारीक तपशीलासह मुंबई नगरीत माणसे पैशासाठी आपले सत्त्व आणि स्वत्व सोडतात. केवळ पोट भरायला आलेली माणसे पाहता पाहता गर्भ श्रीमंत होतात. वैध व अवैध मार्गांचा उपयोग करून ही माणसे पैसा मिळवतात. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात आपल्या नीतिमूल्यांना बाजूला ठेवतात. ती माणसे ज्या मार्गाने पैसे मिळतील तो मार्ग स्वीकारतात याचे चित्रण केले आहे. मुंबईत चोरटा माल, चोरटी निर्यात, स्मगलिंग, जकात चुकविणे, कार्यालयीन गुपित विकणे, वेश्याव्यवसाय, दलाली, भेसळ, जाली नोटा हे आणि असे अनेक अवैध धंदे तेजीत असतात. विनाकष्टाचे पैसे मिळवून देणारे हे धंदे शासनाला बंद करणे शक्य नसते. वरपर्यंत हप्ते पोहोचविण्याची साखळी कार्यरत असते. मुंबईतील अनेक तरुण अशा या अवैध धंद्यात गुंतलेले आहेत. सुरूवातीला पैशाची चटक म्हणून नंतर या

चक्रातून बाहेर पडता येत नाही. दयानंद पानिटकर तरुणाच्या बाबतीत असेच घडलेले आहे. शेवटी त्याचा या अवैध धंद्यातच अंत होतो.

मुंबई महानगरीत वृत्तपत्र व्यवसाय हा बहुरंगी व बहुढंगी आहे. इंग्रजी, हिंदी, मराठी आणि अन्य प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रे, त्यांच्या आवृत्ती इथून प्रसिद्ध होतात. 'वेस्टर्न स्टार्स' या वृत्तपत्राच्या अनुषंगाने अरुण सांधूनी या वृत्तपत्रसृष्टीतील इष्ट - अनिष्ट गोष्टीवर टिका टिप्पणी केली आहे. वृत्तपत्राचे संपादक, सहसंपादक, स्तंभलेखक, पत्रकार, प्रिंटर्स, वितरक, जाहिरातदार अशा अनेक व्यक्तींच्या वर्तनातील बारकावे टिपलेले आहेत.

जिवाजीराव शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. जिवाजीराव शिंदे यांनी जिद्दीनं कॉलेज पूर्ण करून कॉलेजच्या निवडणूका त्याने लढविल्या होत्या. पूढे लग्न करून सांगलीत वकिली सुरू केली. वकिली करीत असताना समाजकार्य करू लागले. वक्तृत्वाच्या बळावर ते जिल्हाबोर्डात निवडून आले. पुढे विधानसभेत आमदार म्हणून निवडून आले. मंत्री झाले अन् अखेर मुख्यमंत्री झाले असा हा जिवाजीराव शिंदे यांचा प्रवास आहे. या प्रवासात त्यांनी अनेक हाल अपेष्टा सहन केल्या. त्यांच्या वागण्यात तडफ होती. ते गरीबाचे कैवारी म्हणून ओळखले जात होते. विरोधी पक्ष मात्र त्यांच्यावर अनेकदा तुटून पडत. भ्रष्टाचारांचे आरोप करीत असातत. मुख्यमंत्री स्मगलर्सना पाठीशी घालतात. आपल्याच नातेवाईकावर लायसेन्सची खैरात करतात. अर्थात या आरोपात अजिबात तथ्य नव्हते असे नव्हे. अशा काही गोष्टी त्यांच्या हातून घडल्या होत्या अनेकानी आपल्या अधिकाराचा वापर करून प्रचंड माया जमविली होती हे जिवाजीराव जाणून होते. पण ते आगतिक हाते राजकारण हे वारांगणेसारख असते. हे ते पुर्णपणे जाणून होते. जो तो सत्तेसाठी धडपडत होता, स्वार्थासाठी भांडत हांता. देशप्रेम, गरीबांचा उद्धार, बेकारीचा प्रश्न हे फक्त भाषणात वापरण्याचे मुद्दे झाले होते. सर्वच पक्ष, सर्व

माणसे ही सत्तेसाठी धडपडत होती. ती कोणत्याही टोकाला जात होती. प्रत्येक नव्या माणसासाठी सत्ता ही कुमारिकाच असते त्यामुळे प्रत्येक पक्ष सत्तेसाठी झगडत असतो. मुंबई नगरी ही अशा सत्तासंघर्षाची साक्षीदार आहे. मुंबईने अनेक निवडणूका, पक्ष पाहिले आहेत. अनेक मुख्यमंत्री पाहिले परंतु सर्वच मुख्यमंत्री हे आपल्या हिताला प्राधान्य देणारे ठरले. मुंबई ही महानगरी या सर्व घटनाची साक्षीदार आहे. तिचे हेच दु:ख आहे. अरुण साधूनी मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे यांच्या माध्यमातून राजकारणातील हेवेदावे, रूसवे फुगवे, डावपेच यांचे दर्शन घडविले आहे.

रवींद्र शोभणे यासंदर्भात म्हणतात, ‘‘मुंबईच्या जीवन चक्राला मराठी माणसाच्या जीवनापेक्षा वेगळा स्तर, वेगळा आयाम आहे. वेगळ्या जीवन जाणिवांनी इथला माणूस बद्ध झालेला आहे. ही वेगळी जाणीव महानगरीय जीवन जाणीव म्हणून ओळखली जाते. या महानगरीय जीवन जाणिवेचे पदर महाराष्ट्रातील इतर कुठल्याही प्रादेशिक वा नागरी जीवन जाणिवांपेक्षा पूर्णत: भिन्न स्तरीय असे आहे. त्यामुळे महानगरीय जीवन जाणिवांतून व्यक्त होणारे ताणे-बाणे, मुल्यात्मकता, अस्तित्वाचे संघर्ष, महत्त्वाकांक्षा, स्वप्ने, रोज मरणाचे प्रश्न यात निश्चित अंतर असल्याचे जाणवते. ‘मुंबई दिनांक’ मध्ये महानगरीय जीवन जाणिवांचे चित्रण हा एक महत्त्वाचा आयाम म्हणून जमेस धरावा लागतो. यातील बहुतेक माणसांचं जगणं या जाणिवांनी वेटाळलेलं आहे. ’’[३]

अरुण साधूंनी वेगवेगळ्या व्यक्तिचित्रणातून मुंबईतील जनजीवनाचे वर्णन करून सर्वसामान्यांचे जीवन किती धावपळीचे, हलाखीचे आहे. तेथील अर्थव्यवस्था कशी आहे हे दाखवतात. महानगरीतील सत्ताकारण, राजकारणाचे रंग कसे बदलतात, स्मगलिंग सारखे अपराध करणाऱ्यांचे जग, वर्तमानपत्रांचे जग यांचे यथार्थ वर्णन करतात. भारतीय नागर जीवनाला लागलेली कीड हाच ‘मुंबई दिनांक’ या कादंबरीचा विषय असून तिचे प्रतिबिंब दाखविणारी मुंबईसारख्या महानगराची पार्श्वभूमी येथे आहे. माणसांचा नैतिक

अध:पात आणि स्मगलिंग सारखी आजच्या शहरी जीवनाचे अपरिहार्य अंग असलेले भ्रष्टाचार हा येथे केंद्रस्थानी आहे.

### ३. मुंबई दिनांक मधील राजकीय जीवनाचे चित्रण

मराठी कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या संदर्भात ऐतिहासिक कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, पौराणिक कादंबरी, महानगरीय कादंबरी, राजकीय कादंबरी, दलित कादंबरी, ग्रामीण कादंबरी असे प्रकार पडतात. अरुण साधूनी 'मुंबई दिनांक', 'सिंहासन' व 'तडजोड' यासारख्या राजकीय कादंबऱ्या लिहिल्या आहेत. मराठी कादंबरी वाङ्मयात राजकीय कादंबरीकार म्हणून आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचे श्रेय अरुण साधू यांच्याकडेच जाते. अरुण साधू हे व्यवसायाने पत्रकार आहे. 'मुंबई दिनांक' या कादंबरीला पत्रकारितेचे अंग आहे हे तिच्या नावावरून स्पष्ट होते. अरुण साधू यांनी पत्रकारितेच्या दृष्टीने समकालीन समाजातील राजकीय घडामोडीचे, त्यातील संघर्षाचे , राजकारणातील डावपेच, त्यातील रूसवे-फुगवे यांचे आपल्या या कादंबरीतून चित्रण केलेले आहे.

अरुण साधूच्या 'मुंबई दिनांक' या कादंबरीत कोणतेही पात्र केंद्रस्थानी नाही. तसेच या कादंबरीला नायक-नायिका नाहीत.

मुंबईसारख्या महानगरी जीवनातील अय्यर, किशोर वझे, दयानंद पानिटकर सेबेशियन डी. कास्टा व जिवाजीराव शिंदे या पाच वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसांचं जगणं एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न अरुण साधू या कादंबरीत करतात. त्यातील अय्यर हा 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राचा चीफ रिपोर्टर आहे. किशोर वझे हा सामान्य मध्यमवर्गीय असा सचिवालयात कारकून आहे, दयानंद पानिटकर हा प्रथम डी. कास्टाच्या युनियनमध्ये ओढला गेला आहे, शेवटी हा स्मगलिंगच्या धंद्यात वावरणारा आहे. डी. कास्टा हा कामगार नेता आहे. केरळमधून मुंबईत येऊन शिक्षण नाही, नोकरी नाही अशा

अवस्थेत अर्धपोटी राहून कामगार नेता म्हणून मान्यता मिळविलेली आहे. जिवाजीराव शिंदे हे साधे वकील परंतु आपल्या समाजकार्यातून व वक्तृत्वाच्या बळावर त्यानी जिल्हा बोर्ड सदस्य ते मुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारलेली आहे. हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. कामगार नेता डी. कास्टा याचा दरारा मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे यांना वाटत असल्यामुळे त्यांनी त्याला जवळ केले आहे. डी–कास्टावर स्मगलर्स, अवैध धंदेवाले जळत असतात. कामगार, टॅक्सी ड्रायव्हर अशा सामान्य लोकांना तो आपला वाटतो. जिवाजीराव शिंदे व डी–कास्टा या दोन्ही व्यक्ती प्रत्यक्ष राजकारणात वावरणाऱ्या आहेत. जिवाजीराव शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असून राजकारणाची सर्व सूत्रेच त्यांच्या हातात आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणाला योग्य दिशा देण्यासाठी त्यांच्या हातात अधिकार आहेत. त्यांचे अर्थमंत्र्यांशी पटत नाही. एकमेकांचे पत्ते काटायचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांचा संघर्ष आहे. मख्यमंत्र्यांच्याकडे त्यांच्या व इतर मंत्र्यांच्या फायली तयार आहेत. मुख्यमंत्र्यांना राजकारणातील बऱ्यावाईट गोष्टी व कुणाचा किती उपयोग करून घ्यायचा या गोष्टी माहित आहेत. ते ही स्वत: धुतल्या तांदळासारखे आहेत असं नाही. दयानंद पानिटकर हा स्मगलिंगच्या धंद्यात अडकलेला आहे. त्यातून त्याला सुटायचे आहे पण या स्मगलिंगच्या धंद्यात आत जाणं जितकं सोपं, तितकं बाहेर येणं सोप नाही. यावर अरुण साधू लिहितात की, ‘‘एकदा आत पडलं की बाहेर निघता येत नाही. भयंकर धोकेबाज जग आहे हे. इथल्या प्रत्येकाला जीवाची भीती आहे.’’[४]

दयानंद पानिटकर हा स्मगलिंगच्या धंद्यातून बाहेर जायचा प्रयत्न करतोय असं कळताच त्याचा बॉस त्याला संपवतो. किशोर वझे सचिवालयात कारकून असून आपल्याला काहीच भवितव्य नाही असे वाटणारा आहे. आपण जगायच्या लायकीचे नाही याची सतत जाणिव होत असल्यामुळे त्याच्यात न्युनगंड निर्माण झाला आहे. अय्यरला स्मगलर्सची बातमी दिल्याबद्दल बॉसकडून तंबी मिळते. डी–कास्टा हा कामगार

चळवळीशी बांधलेला असल्यामुळे तो अप्रत्यक्षपणे राजकारणात आहे या कामगार नेत्याला मुख्यमंत्री आपल्या बाजूना घेवू इच्छितात. त्याला कामगारविषयक सल्लागार मंडळाची जबाबदारी देऊ असे सांगतात. ही संधी स्वीकारावी का, स्वीकारली तर आपल्या कामगारांमधल्या 'व्यक्तिमत्त्वाचे काय या भितीने तो धास्तावला आहे. या कादंबरीतील जग हे शह-काटशहांच आहे. दुसऱ्याला खाऊन टाकण्याची प्रत्येकाची रीत वेगळी आहे. इथे प्रेम, दया नाही, हे राजकारण क्रूर आहे. कोण कुठे फेकला जाईल हे सांगता येणार नाही असे हे राजकारण या कादंबरीत आलेले आहे. मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे व कामगार नेता डी. - कास्टा या व्यक्तीरेखांचा माध्यमातून राजकारणाचे, राजकीय जीवनाचे अनेक तपशील या कादंबरीत येतात. म्हणून ही कादंबरी राजकीय कादंबरी आहे असे म्हटले जाते.

## ४. 'मुंबई दिनांक' मधील राजकीय व सामाजिक घडामोडी, अवैध धंदे यांच्या संदर्भातील पत्रकारितेचे चित्रण

'मुंबई दिनांक' या कादंबरीमध्ये महाराष्ट्रातल्या विशेषत: मुंबईच्या राजकारणातील काही पेचदार संदर्भ वृत्तपत्रीय पातळीवरून अरुण साधू यांनी मांडले आहेत. मुंबई महानगरीतील वृत्तपत्र जगताचे वर्णन या कादंबरीतून केलेले आहे. राजकीय तडजोडी, काळे धंदे, पोलीसांची धावपळ, खूनी हल्ले, राजकीय नेत्यांची घुसमट यांचे प्रत्ययकारी दर्शन वृत्तपत्रीय निवेदनाद्वारे आले आहे. मुंबई महानगरीत वृत्तपत्र व्यवसाय हा बहुरंगी आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, तेलगू, कन्नड, गुजराती व अन्य प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रे रव त्यांच्या आवृत्या मुंबई मधून प्रसिद्ध होतात. अरुण साधू यांनी 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राच्या अनुषंगाने वृत्तपत्र व्यवसायातील बारकावे, मुंबईत घडणाऱ्या राजकीय व सामाजिक घडामोडी, मुंबईतील अवैध धंदे या बाबींवर उपरोधकपणे चित्रण केले आहे. वृत्तपत्राचे मालक, संपादक, सहसंपादक, स्तंभ लेखक, पत्रकार, जाहिरातदार, वितरक, प्रिंटर्स, वार्ताहर अशा अनेक माणसांच्या वर्तनातील बारकावे टिपले आहेत.

'मुंबई दिनांक' या कादंबरीतून 'वेस्टर्न स्टार' या इंग्रजी दैनिकातील चीफ रिपोर्टर अय्यर च्या माध्यमातून पत्रकारिकतेचे चित्रण केले आहे. मुंबईत 'वेस्टर्न स्टार' वृत्तपत्र सुरू होऊन चार वर्षे झाली आहेत. मुंबईतील इतर इंग्रजी दैनिकांशी त्याची स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अय्यर रोज एक तरी सनसनाटी बातमी देत असतो.

मुंबई नगरीत राजरोसपणे अवैध धंदे चालू असतात. यामध्ये जुगार, मटका, दारू, वेश्याव्यवसाय,तस्करी हे धंदे आहेत. स्मगलिंग हे मुंबईत फार मोठ्या प्रमाणावर चालत असून मुंबई हे त्याचे प्रमुख केंद्र आहे. अय्यर मुंबईतील स्मगलिंगची बातमी देतो. ही बातमी 'वेस्टर्न स्टार' च्या पहिल्या पानावर छापून आलेली असते. या बातमीमुळे सर्व रिपोर्टर्सना व न्यूज एडिटरला धक्का बसतो. या बातमीचा मथळा फारसा परिणामकारक नव्हता कारण यामध्ये कुणाचेही नांव नव्हते. परंतु त्या बातमी मधून अनेक अर्थ निघू शकत होते. त्या बातमीच्या आधारे स्मगलिंगच्या धंद्यात असणाऱ्या अनेकांची नावे, त्या धंद्याच्या जागा ध्वनित होत होत्या. काही नावाजलेल्या कंपन्या, स्मगलिंग कसे चालते, कुणाकुणाचे त्यात कसे लागेबांधे असतात, कोण कोणाला कसे पाठीशी घालते इ. माहिती त्या बातमीत होती. या बातमीमुळे सर्वत्र धम्माल उढाली होती कामगार नेता– डी. कास्टाने पुरविलेल्या माहितीचा कौशल्याने वापर करून ही बातमी तयार करून अय्यरने प्रसिद्ध केली आहे.

अय्यरने दिलेली स्मगलिंगची बातमी वाचून न्यूज एडिटरचा चेहरा पडलेला होता. अय्यरने बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी न्यूज एडिटरला दाखविली नव्हती. या बातमीबद्दल त्याला मालकाचा ही फोन झालेला आहे मालक या बातमी विषयी रागावला आहे. स्मगलिंगची बातमी लावल्याबद्दल डी. कास्टाने अय्यरचे अभिनंदन करून त्याने स्मगलिंगविषयी अजुनही जास्त माहिती आपल्याकडे आहे ती फक्त तुला देण्यासाठी ठेवली आहे असे सांगतो. स्मगलिंगची बातमी मुख्यमंत्र्यापर्यंत समजली आहे.

मुख्यमंत्र्याना ही बातमी झोंबली आहे. या बातमीबद्दल 'वेस्टर्न स्टार' च्या मालकाला समज दिली जाते. या बातमीमुळे 'वेस्टर्न स्टार' चा मालक चिडलेला आहे. ज्यावेळी मालक अय्यरला बोलावतो, त्यावेळी अय्यर आपल्या पत्रकारिता व्यवसायाबद्दल बोलतो की, ''साला अपना धंदाही ऐसा है. त्यापेक्षा वेश्या बऱ्या सालं मालकापुढे झोपायचं, ॲडव्हर्टायझर्सपुढे झोपायचं आणि मंत्र्यापुढेही झोपायचं. रीडर मेला आणि काम करणारे मेले. बाकी सगळे खोऱ्याने पैसे ओढणार.''[५] हे अय्यरचे बोलणे योग्य आहे असे वाटते.

स्मगलिंगच्या बातमीविषयी नाही तर एखाद्या जाहिरात दाराला मस्का लावण्यासाठीच आपल्याला 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राच्या मालकाने बोलावले असेल असे अय्यरला वाटते. अय्यर हा महाराष्ट्राच्या आणि शिवसेनेच्या विरूद्ध बातम्या देत असल्यामुळे व स्मगलिंगची बातमी दिल्यामुळे मालक चिडलेला असतो. अशा बातम्या देणे हे आपल्यासाठी चांगले नाही, आपण मुंबईत आहोत. आपला पेपर मुंबईत आणि महाराष्ट्रात खपतो. तो एक धंदा आहे या सर्व गोष्टीचा आपल्या पेपरच्या जाहिरातीवर परिणाम होईल, त्यामुळे आपला पेपर ब्लॅक लिस्टमध्ये जाईल, तसेच मला पेपर चालवायचा आहे, बंद करायचा नाही अशा शब्दात मालक भंडारी अय्यरला समज देतो. यावेळी अय्यर चिडून इंग्रजीत बडबडतो की, ''यापेक्षा वेश्या बऱ्या. त्या उघड धंदा तरी करतात. साला काय जर्नालिझम आहे की, हजामगिरी? हा म्हातारा स्वत:ला कोण समजतो? त्याच्या पेपरचा खप मी वाढवून दिला आहे. आणि हा मला शिकवतो. यापेक्षा साला खानावळ टाकलेली बरी. जर्नालिझम मधलं झाट तरी कळत का? आणि मला शिकवतो सरकारच्या आणि शिवसेनेच्या विरूद्ध बातम्या देऊ नको म्हणून. साल्या बातम्या कोणाच्या विरूद्ध आणि कोणाच्या बाजूच्या हे आम्हाला माहिती नाय. बातमी म्हणजे बातमी म्हणजेच बातमीच''.[६] अय्यरने व्यक्त केलेले विचार योग्य वाटतात. आपल्या वृत्तपत्राच्या जाहिराती जातील, राजकारणी मंडळी उलटे सुलटे बोलतील, तसेच

लोक वृत्तपत्र जाळतील म्हणून योग्य असणाऱ्या, खऱ्या असणाऱ्या, समाजातील वास्तव उघड्या करणाऱ्या बातम्याच प्रसिद्ध करावयाच्या नाहीत का? असा प्रश्न अय्यरला पडतो.

अय्यरच्या स्मगलिंग वरील बातमीचा मथळा मुख्यमंत्र्यानाही खटकला होता. अय्यरची स्मगलिंग ची बातमी विस्तृत असून ती अस्पष्ट आहे. त्यामधील आरोप गंभीर प्रकारचे आहेत. असे मुख्मंत्र्याचे पी. ए. मुख्यमंत्र्यांना सांगतात. यावर काय करायचे असे सांगताना 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राच्या मालकाची दोन-तीन लीज प्रकरणं आपल्याकडे पडून आहेत. यावर मुख्यमंत्री पी. ए. ना सांगतात की, ''अं हं एकदम तिथपर्यंत हात घालू नका. मधल्या मध्येच काही बघा. उगीच अवास्तव माहिती छापून येण्यात काय अर्थ आहे? जरा समज द्या म्हणजे झालं. कुणाला ते तुम्ही बघा.''[७]

समलिंगची बातमी अय्यर याने डी-कास्टाने पुरविलेल्या माहितीवरून दिली आहे. डी-कास्टा हा कामगार नेता आहे. चोरट्या आयातीच्या बातम्या तो अय्यरला पुरवीत असतो. अय्यरचे डी-कास्टाशी असणारे संबंध चांगले आहेत. मुख्यमंत्री ही अय्यरला भेटण्यासाठी बोलवतात. स्मगलिंगच्या बातमीविषयी किमान तेरा ते चौदा फोन येतात. बातमी योग्य असल्याचे सांगितले जाते. 'वेस्टर्न स्टार' चा मालक भंडारी याच्या बोलण्याने अय्यर अस्वस्थ झाला होता. परंतु त्याला माहित होते की, भंडारी आपल्याला सोडणार नाही. आपल्यामुळे त्याचा पेपर चालतो. अय्यर हा पर्सनल कॉलम देत असतो.

'वेस्टर्न स्टार' मधील स्मगलिंगच्या बातमीला अनुसरून लॉजचे काका बोलतात, 'अरे चोर सगळे'. मंत्री काय न् अधिकारी काय. ती शाह केस आठवते तुम्हांला? दोनशे कोटी रूपयांची? काही झालं पुढं त्या केसचं? काहीच नाही. काहीच होणार नाही. कारण नाटकच सगळं. सगळेच चोर. अहो, तुम्हाला कल्पना येणार नाही. किती बडीबडी मंडळी या लफड्यात असतात ते. मागे तर एका केंद्रीय मंत्र्यानंच चक्क

जाहीर कबुली दिली होती की, आम्ही या लोकांना पकडू शकत नाहीत, इतके ते मोठे आहेत. ते जगच वेगळं आहे महाराज. ही मुंबई वेगळी आणि त्यांची मुंबई वेगळी. तिथे सगळा हिशेब कोटीत चालतो आणि हे वर्तमान पत्रवाले तरी काय लिहितात? या 'वेस्टर्न स्टार' च्या मालकाची काय काय लफडी आहेत माहीत आहे? अहो, इथल्या कुठल्याही माणसावर भरंवसा ठेवू नका. जरा कोर्टातल्या हॉटेलमध्ये डोकावून बघा, पैसा कसा वाहतो ते, आणि हा कास्टा. मारे गप्पा मारतो यंव करू, त्यवं करू... एक दिवस बघाल कास्टाला गप्प बसलेलं. पैसा कुणाला नको आहे? आणि हे लोक तर कुणालाही विकत घेऊ शकतात. कास्टाही काय? आपली किंमत वाढवून घेतो आहे झालं. कास्टा एवढा बडबड करतो पण त्याच्यावर खटला भरला आहे कोणी? गरज नाही. कारण, त्यांना माहित आहे आपला केसही कोणी वाकडा करू शकत नाही. एक काय, हजार कास्टा भुंकले तरी त्यांच्या मिशीतला बाल हलणार नाही बघा!'[१०] या साऱ्या गुंतागुतीतून अरुण साधूंनी गुन्हेगारी व सरकारी पातळीवरील चालत असलेला भ्रष्टाचार, निर्भयपणे मांडला आहे. तो योग्य असल्याचे दिसून येते. अय्यर हा रोजच्या रोज एंगेजमेन्टस् तपासून कामे वाटून देत असतो. अय्यर महत्त्वाच्या गोष्टी आपल्या डायरीमध्ये नोंद करीत असतो. अय्यरच्या एंगेजमेन्टस्च्या डायरीबद्दल अरुण साधू लिहितात की, 'दोन थर्ड क्लास प्रेस कॉन्फरन्सेस, चीफ मिनिस्टरच्या दोन सभा, त्यातलं एक एका फॅक्टरीचं उद्घाटन, कॅबिनेट मिटींग, दोन मोर्चे, ऑस्ट्रोलियन व्यापारी शिष्टमंडळाच्या हालचाली, वर्ल्ड बँकेच्या टीमची मुख्यमंत्र्याशी भेट, सुंदराबाई हॉलमधील सर्व पक्षीय... आणखी असंच काही सटरफटर.'[११] अशाप्रकारची एंगेजमेन्टस् डायरी वृत्तपत्रातील चीफ रिपोर्टराना दररोज लिहावी लागते. अय्यर रोज नवीन येणाऱ्या बातम्या तपासून त्याचे रिपोर्टस् तयार करून तो डेस्कवर पाठवून देत असे. इव्हिनिंगसाठी कोणते रिपोर्टस येणार आहेत याचा फॉर्म भरून न्युज एडिटरला देत असतो. प्रत्येक रिपोर्टस् ऑफिसला येऊन आपले रिपोर्टस्

टाइपरायटरवर तयार करतात. अय्यर नेहमी बातम्यामध्ये एखादी स्वल्पविरामाची, व्याकरणाची चूक काढून ज्यूनिअर रिपोर्टरला बोलत असतो.

अय्यर नेहमी इतर वृत्तपत्रातील बातम्या वाचत असताना आपल्या 'वेस्टर्न स्टार' वृत्तपत्रकारिता उद्याच्या अंकासाठी बातम्या तयार करणारा हुशार चीफ वार्ताहर आहे. त्याला रेल्वे बोर्डाचा एक मेंबर मुंबईत येणार असल्याचे समजते. हळूच जाऊन त्याची मुलाखत घेऊन मुंबईच्या भुयारी रेल्वेबद्दल बातमी देऊन सर्वत्र धमाल उडवून देण्याचे ठरवतो. अय्यरने एक वार्ताहर म्हणून गेली ३० वर्षे मुंबईची वाढ होताना पाहिली आहे. काही सुधारणाही त्याने सुचविलेल्या होत्या. काही इमारतींना, सुधारणांना त्याने आपली वृत्तपत्रीय ताकद वापरून असा काही खोडा घातला होता की, त्या होऊच शकल्या नाहीत.

अय्यर हा चीफ वार्ताहर असल्यामुळे वृत्तपत्रातील बातम्याची जबाबदारी त्याच्यावर असते. अय्यर हा रोज ऑफिसला येऊन मस्टरवर सही करतो. अय्यर नेहमी ऑफिसला आल्यानंतर पोलीस व फायर ब्रिगेडला फोन करून सर्व काही शांत असल्याची खात्री करून घेत असतो. सर्व वार्ताहरांना ठरविलेली कामे वाटून देण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. अरुण साधू 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राच्या कार्यालयीन कामकाजाबद्दल म्हणतात की, ''पहिला रिर्पोटर यायला अजून तासभर अवकाश होता. शिपिंगचा, बंदरच्या, गोदी कामगारांचा बातम्या देणारा रिर्पोटर अकरापर्यंत येईल. डे कॉल्सवाला एव्हाना कॉरोनरच्या कोर्टात गेला असेल, आणि एक एक्स्प्लेनेड कोर्टात. आज तिघे रिर्पोटर रजेवर. म्हणजे हाताशी उरले फक्त आठ. त्यातला एक एअरपोर्ट, एक सचिवालय, एक कार्पोरेशन, एक क्राईम आणि एक नाईटला. म्हणजे खरे उरले तीनच. बोंब. साली आज काम खंडीभर, सगळे बोंबा मारतील. मालकाला सांगितल, चार माणसं वाढवून दे. तर तो ही नाक मुराडतो. न्युज एडिटरला फक्त मालकाला मस्का मारणं ठाऊक. बातमी

चुकली की ठो ठो करतो. परंतु त्याच्या मस्क्यासाठी एखाद्या रिपोर्टरला उगाचच एखाद्या फालतू फंक्शनमध्ये अडकून पडावं लागतं. कां काय साली रीत झाली? टाइम्स, फ्री प्रेस यांच्या जवळ वीसवीस माणसं आहेत. हे नाही बघत. "[९]

"दहा वाजत आले होते आणि ऑफिसातली धावपळ वाढू लागली होती. सब एडिटर्सच्या टेबलांवरचे आवाज वाढत होते. सगळे टेलिप्रिंटर्स धडधडा वाजत होते. खालच्या मजल्यावर मशीन रूम मध्ये ही हालचाल सुरू झाली होती. "[१०] यामधून अरुण साधू यानी वृत्तपत्रातील कार्यालयीन कामकाज कसे चालते. वार्ताहराचे कामकाजाचे वर्णन करतात.

'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्रात स्मगलिंगची बातमी सोडल्यास विशेष असे काही नव्हते. मुख्यमंत्र्यांची एक घोषणा, ऑस्ट्रेलियन व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाच्या भेटी, वर्ल्ड बँकेच्या टीमचं आगमन, कामगारांचे काही संप, आणि मोर्चे, पाच-सात नेहमीचे समारंभ, जाहिरातदारांना मस्का लावण्यासाठी दिलेली काही पत्रकं, एका सिनेनटीवरचा सनसनाटी खटला, दोन साधे खून, मारामारी, एक मारामारी, इतर चिल्लर गुन्हे आणि किरकोळ अपघात इ. विषयीच्या बातम्या 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्रात होत्या.

'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्रात धीरू ही वार्ताहर आहे. धीरू हा आपल्या सुट्टीच्या दिवशी वेस्टर्न रेल्वेचे डब्बे रूळावरून घसरल्याचे अय्यर सांगतो. परंतु अय्यर त्याला ती बातमी तेथे जाऊन कव्हर करायला सांगतो व ऑफिसमध्ये देण्यास सांगतो. यावर धीरू म्हणतो की, "साली यापेक्षा भंग्याची नोकरी बरी. काम-धंदा आहे की काय? बायको आत्ताच घटस्फोटाची बात करते आहे."[१२] हे धीरूचे वाक्य योग्य आहे असे वाटते. वृत्तपत्रातील वार्ताहरांच्या जगण्यात नेहनीच थ्रील असते. बातम्या गोळा करणे, त्यातही सनसनाटी बातमी शोधून काढणे, त्यासाठी अनेक भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करणे, त्या व्यवस्थित लिहून वेळेमध्ये वृत्तपत्राला पोहोचविणे अन् समाजात

खळबळ माजवणे हा त्यांचा दररोजचा उद्योग आहे. वार्ताहराचा प्रत्येक दिवस काळजीचा असतो. बातम्या मिळविण्यासाठी धावपळ करावी लागते. प्रसंगी खोटे बोलावे, हसावे लागते. मनात नसताना पार्टीला जावे लागते. या जीवघेण्या स्पर्धेत टिकावे लागते.

जिवाजीराव शिंदे हे मुख्यमंत्री असून ते राज्यातील वृत्तपत्रातील महत्त्वाच्या बातम्या वाचत असतात. मुख्यमंत्री हे भाषणातून आणि वृत्तपत्रातून देशातील दारिद्र्य दूर करण्यासाठी आपण काय काय प्रयत्न करीत आहोत, कोणती धोरणे राबवित आहोत हे स्पष्ट करीत असत. गरीबांचे दु:ख दूर करण्यासाठी आपण सत्ता उपयोगात आणीत आहोत हे सांगतात. कधी-कधी वृत्तपत्रातील बातम्यामध्ये त्यांच्यावर स्तुतिपर लेख येतात. त्यांना वृत्तपत्रातील महत्त्वाच्या बातम्यांचे कात्रणं काढून ठेवण्याची सवय आहे. वृत्तपत्रातील एका बातमीमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्याने एका ठिकाणी मुलाखत देताना सांगितले होते की, पुढील निवडणुकीच्या आधी विधानसभेचे जे अधिवेशन होईल त्यातच शिंदे मंत्रिमंडळाचा आम्ही पराभव करू! या विधानावरून मुख्यमंत्री यांना हसू येते. वृत्तपत्राच्या मुलाखतीत मुख्यमंत्री नेहमीच सांगत असतात की, 'देशातील दु:ख, दारिद्र्य सहन न होऊन ते नाहीसे करण्याच्या उद्देशानं मी राजकारणात उडी घेतली आहे.' मुख्यमंत्री हे वृत्तपत्रांची कात्रण वाचत असताना त्यातील एक छोटीसी बातमी वाचून त्यांचा चेहरा गंभीर होतो. ती बातमी पुढीलप्रमाणे आहे.

पुणे : सोमवार : 'सध्याच्या शासनासारखं भ्रष्ट सरकार उलथून पाडणं हे मी माझं प्रथम कर्तव्य समजतो आणि त्यासाठीच मी येती निवडणूक लढविणार आहे.' असे उद्गार सुप्रसिद्ध स्वातंत्र्य योद्धे श्री. बापुसाहेब जोशी यांनी आज येथील जाहीर सभेत काढले.

श्री. जोशी म्हणाले, ''भ्रष्टाचार आणि लाचलुचपत यांनी एवढी हीन पातळी कधीच गाठली नव्हती. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचलं त्यांना आजची

राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहून आपलं जीवन आणि कार्य व्यर्थ गेल्यासारखं वाटेल. भ्रष्टाचार हा राज्याच्या नेत्यावर अवलंबून असतो. नेता जर स्वत: स्वच्छ असला आणि कडक असला तर भ्रष्टाचाराला परिणामकारक आळा घालू शकतो. म्हणून हे नेतृत्त्व बदलण्याची मोहीम आम्ही हाती घेणार आहोत, असे श्री. जोशी यांनी जाहीर केले.''[१३]

या बातमीवरून असे वाटते की भ्रष्टाचार हा राजकारणाचा अविभाज्य घटक झाला आहे. भ्रष्टाचाराने बजबजलेली ही लोकशाहीच आता तिला विरोधी असणाऱ्या प्रवृत्तींना आमंत्रण देत आहे असे वाटते. मुख्यमंत्री स्मगलर्सना पाठीशी घालतात, आपल्याच नातेवाईकावर लायसेन्सची खैरात करतात असे भ्रष्टाचाराचे आरोप मुख्यमंत्र्यावर होतात. पण या आरोपात तथ्य होते. कारण अशा काही गोष्टी त्यांच्या हातून घडल्या होत्या. पण त्याला त्यांचा नाईलाज होता. या कादंबरीतील राजकीय नेत्यांची भाषणे, निवेदने, राजकीय आरोप-प्रत्यारोप हे वृत्तपत्रातील बातम्याचे विषय ठरतात.

## ४.१ 'मुबंई दिनांक' मधील पत्रकार व्यक्तिरेखा

अरूण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' या कादंबरीत अय्यर , पोंक्षे, धीरू, शर्मा, व साने या पत्रकार व्यक्तिरेखा आहेत. या कादंबरीत 'अय्यर' ही मुख्य पत्रकार व्यक्तिरेखा आहे.

**अय्यर**

अय्यर हा मुंबईतील 'वेस्टर्न स्टार' या इंग्रजी दैनिकाचा चीफ रिपोर्टर (मुख्य पत्रकार) आहे. मुंबई मध्ये वेस्टर्न स्टार सुरू होऊन चार वर्षे झालेली आहेत. अय्यरला आपल्या स्वत:च्या बुध्दीचा आणि वृत्तपत्रीय कौशल्याचा गर्व आहे. वेस्टर्न स्टार चा मालक त्याला चीफ रिपोर्टर म्हणून अठराशे रूपये महिन्याला पगार देत होता. अय्यर आपल्या वेस्टर्न स्टार वृत्तपत्रात न चुकता मुबंईच्या सर्व बातम्या देत असतो. रोज एक

तरी खास सनसनाटी बातमी असणे हे 'वेस्टर्न स्टार' वृत्तपत्राचे वैशिष्ट्य होते. अय्यरच्या खमकेपणामुळे मुंबईतील इतर पेपर्सचे चीफ रिपोर्टर घाबरून आहेत.

अय्यर हा मूळचा मद्रास येथील आहे. त्याने मद्रास मध्ये टायपिंग चा कोर्स केल्यानंतर तो मुंबईत आला होता. मुंबई मध्ये त्याने सरकारी कचेरीत टायपिस्ट म्हणून काम केले आहे. त्याचे टायपिंग हे अतिशय जलद आहे. पुढे त्याने टेलिग्राफ ऑफीस मध्ये प्रिंटर वर काम केले. तिथून त्याने टाइम्स मध्ये टेलिप्रिंटर ऑपरेटर म्हणून काम केले. अय्यर मॅट्रीक झाल्यानंतर बॉम्बे क्रॉनिकल मध्ये रिपोर्टर म्हणून कामाला लागला. पुढे त्याची पत्रकारिता वाढत गेली. आपल्या बुध्दीचा आणि उत्साहाचा जोरावर दुसरे महायुध्द, बेचाळीसचा लढा, फाळणी, स्वातंत्र्य, काश्मिर लढा, भारत-पाकिस्तान युध्द, गोवा मुक्तिसंग्राम या झंझावती घटना बरोबर पत्रकार म्हणून नाव कमावित गेला. अय्यर हा मद्रासचा असला तरी मद्रास, बेंगलोर बद्दल त्याला तिरस्कार वाटत होता. मुंबई त्याला आवडत होती. मुंबई या शहरावर त्याचे प्रेम होते. अय्यर म्हणतो की, ''जगातल्या कुठल्याही शहरापेक्षा मला मुंबई अधिक आवडते. आय लव्ह बाँबे, आय लव्ह महाराष्ट्र. आय हेट तामिळनाडू अँड आय हेट कर्नाटक.''[१४] अशी अय्यर ची प्रतिक्रिया आहे. अय्यर ने स्वत:चे आयुष्य विसरून मुंबईचा समुद्र हटताना, झाड तुटताना, वस्ती, कारखाने आणि बजबजपुरी वाढताना पाहिले आहे. यातील काही गोष्टींना विरोधही केलेला आहे. मुंबईची ट्रॅम जाताना आपल्या बातम्यांमधून रडला आणि पत्रकार म्हणून मुंबई बरोबर वाढला.

अय्यरला सिगारेटचे, व्हिस्की व्यसन आहे. अय्यर हा अविवाहित असून तो एकटा राहतो. अय्यरला रोज चार तास झोपण्याची व सकाळी पेपर वाचण्याची सवय आहे. अय्यरला दररोज सकाळी आपल्या दिवस भराच्या कामाची यादी करून त्याप्रमाणे कामे करण्याची सवय आहे. अय्यर ने आपली वृत्तपत्रीय ताकद वापरून

मुंबईत बऱ्याच सुधारणा घडवून आणण्यास मदत केली आहे. अय्यरला आपल्या वृत्तपत्रीय ताकदीचा अभिमान आहे. अय्यरची अम्मी वारलेली असून त्याला एक बहीण आहे. परंतु ती, त्याला विचारीत नाही. अय्यरचा वेश्यांशी व इतर स्त्रियांशी संबंध आहेत. त्यात सॅली, कमळाबाई, मिसेस खान, या आहेत. सॅली या वेश्येने अय्यरसाठी धंदा सोडून दिलेला आहे. अय्यर हा सॅलीकडे नेहमी जात असतो. सॅली ही जगातील सर्वात सुंदर स्त्री आहे असे अय्यरला वाटत असते. अय्यरचे सॅलीवर प्रेम आहे. सॅलीही अय्यरशी इमान राखून आहे. अय्यरला सॅलीशिवाय एक दिवसही राहवत नसे. अय्यरने सॅलीवर भरपूर पैसे खर्च केले आहेत. अय्यरला सॅलीबरोबर लग्न करावेसे वाटते होते. पण ते त्याला शक्य झाल; नाही. पुढे सॅली गुप्तरोगाने आजारी पडते. अय्यर तिच्या अजारपणाचा खर्च करतो. सॅली अजारपणामुळे कृश झाली होती. सॅली आजारी पडल्यापासून अय्यर एकदा दोनदा तिला भेटावयास जातो. सॅली चा भाऊ टॅली हा सॅली खूप आजारी असून ती झोपेत तुमचे नाव घेत आहे. असे फोन वरून अय्यरला सांगतो. परंतु अय्यर टाळाटाळ करीत असतो. पुढे अय्यरला सॅलीचे निधन झाल्याचे समजल्यावरून अय्यर तिला बघायला जातो. तो तिच्या अंत्यसंस्कारासाठी पाचशे रूपये खर्च करतो.

अय्यरचे मि. खानशी बातमीसाठी संबंध आला होता. अय्यरने मि.खानला एक्सपोर्ट प्रमोशनच्या कामगिरीवर 'वेस्टर्न स्टार' च्या वैयक्तिक कॉलमध्ये एक लेख लिहिला होता. तेव्हापासून मि.खान अय्यरवर खुष होते. त्यावेळी मिसेस खानची दाट ओळख झाली होती. अय्यर आणि मिसेस खानच्या ओळखीचे रूपांतर प्रेमामध्ये झाले. ते पुढे अनैतिक संबंधापर्यंत गेले. अय्यर प्रेमाबद्दल म्हणतो की, ''प्यार अपने लिये नही है. किंबहुना प्रेम ही भावनाच खोटी असावी. शारीरिक वासनेंच भावनिक पातळीवर प्रोजेक्शन म्हणजे प्रेम.''[१५] या अय्यरच्या बोलण्यात तथ्य आहे असे वाटते.

मिसेस खानचा प्रशस्तपणामुळेच अय्यरला ती आवडत होती. मिसेस खान कशी खूष होते हे अय्यरला माहित होते कारण एका बेसावध क्षणी मि.खान यानींच तिचा कूबकवत अय्यरला सांगितले होतो. अय्यर प्रत्यक्षात या कूबकुवत वापर करून मिसेस खानला खूष ठेवीत असे. मि. खानला त्याच्या शिवाय चैन पडत नसे. मिसेस खान नेहमीच कंपनीच्या कामानिमित्त बाहेर दौऱ्यावर जात असत. अय्यर नेहमी मिसेस खान यांना भेटावयास जात असतो. अय्यरचा मंगळाबाई वेश्येशी संबंध होता. मंगळाबाईचे वय झाल्यामुळे (म्हातारी झाल्यामुळे) गिऱ्हाईक मिळत नसे. अय्यर मंगळाबाईला कर्तव्य म्हणून खर्चासाठी पैसे देत असतो. अय्यरने टायपिस्ट ते चीफ रिपोर्टर असा प्रवास केलेला आहे. तो आपली पत्रकारिता प्रामाणिकपणे पार पाडत असतो.

अय्यरला सॅलीचे निधन झाल्यानंतर त्यांला कुठे एक शब्द वाईट वाटत. त्याला कु ठे जायचे आहे याचंही भान राहत नाही. आपण काय करतो आहोत याची जाणीवही नव्हती. याबद्दल अरुण साधू लिहितात की, "जाणीव हवी तरी कशाला? जाणिवपूर्वक आपण कुठल्या गोष्टी करतो? कोण करतो? जगातल्या सर्व गोष्टी शेवटी एकाच लहानशा वस्तूभोवती केंद्रीत झाल्या आहेत ना? प्रिन्सिपल ऑफ लाइफ! आपण सॅलीकडे का ओढले गेलो? मिसेस खानसाठी आपण आपल्या कामाची ही तमा का करीत नाही? लाइफ इज ॲक्सिडेंट. आपण अम्मींकडं लक्ष का दिलं नाही? लग्न का केले नाही. जंस्ट सो. रंडीबाजी का केली? उगाच या धंद्यात तरी का शिरलो? अपघात जाणूनबुजून थोडेच आपण इकडे आलो? आणि भंडारीशी भांडून आपण नोकरीवर लाथ मारली तरी त्यामागे काही नाही. जस्ट सो. देअर इज नो प्रिन्सिपल ॲट ऑल! आपण प्रिन्सिपलचे माणूसच नाही'[१६] असे अय्यर म्हणतो.

## ४.२ पत्रकार अय्यरचे विशेष

'मुंबई दिनांक' या कादंबरीतील अय्यर या पत्रकार व्यक्तिरेखेचा विचार केल्यानंतर त्याच्यातील काही वैशिष्ट्ये दिसून येतात. ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. अय्यरकडे जिद्द, चिकाटी, कष्ट करण्याची तयारी, तत्परता, कामावरील निष्ठा, बुद्धीमान, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व इ. गुण आहेत.

२. अय्यरला विविध विषयाचे ज्ञान असून त्याला आपल्या वृत्तपत्रीय ताकदीचा अभिमान आहे.

३. अय्यर हा निर्भिड व प्रामाणिक पत्रकार आहे.

४. अय्यरच्या सर्व स्तरातील लोकांच्या ओळखी आहेत. सर्व समाजात, राजकीय वर्तुळातील लोकांच्यात मिळुन-मिसळुन वागण्याची त्याची सवय होती. फोटोग्राफर, चित्रकार, राजकारणी, कामगार चळवळीचे नेते यांच्याशी स्नेहाचे संबंध होते.

५. अय्यरला आपल्या वृत्तपत्रीय कामाचा उरक होता. सर्व वार्ताहरांच्या बातम्या तो तपासून पाहत असे. एखादी व्याकरणाची चूक काढून वार्ताहरांना बोलून समज देणारा आहे.

६. दुसऱ्या वृत्तपत्रापेक्षा आपले वृत्तपत्र जास्त खपावे यासाठी अय्यर अनेक नवनव्या क्लृप्त्या शोधून काढत असे.

७. अय्यरला पत्रकारितेत मनापासून रस होता, आवड होती. त्याच्या बातम्या इतरांपेक्षा तपशिलात, माहितीत पूर्णपणे वेगळ्या असत. तो चौकस बुद्धिचा जिद्दी पत्रकार आहे.

८. अय्यरने वेगवेगळ्या विषयांवर प्रचंड लेखन करून पत्रकार म्हणून नाव कमाविले आहे. त्याला आपल्या पत्रकारितेचा गर्व आहे.

९. अय्यरची पत्रकारिता ही शोधक आहे. बातमी मिळविताना ती बिनचूक आणि बारकाव्याने मिळवतो.

१०. अय्यर हा अनुभवी, नावाजलेला पत्रकार आहे. त्याच्याकडे स्पर्धेत टिकून राहण्याचे कौशल्य आहे.

११. अय्यर हा तल्लख बुद्धीचा असून बेछूट, जबरदस्त लेखणी असणारा पत्रकार आहे.

**पोंक्षे**

पोंक्षे हा मुंबईतील 'वेस्टर्न स्टार' या इंग्रजी दैनिकाचा रिपोर्टर आहे. पोंक्षे हा नेहमीच सचिवालयातील बातम्या देत असतो. परंतु एखादया दिवशी इतर वार्ताहर गैरहजर असले की अय्यर त्याला कॅबिनेट मिटींग, मुख्यमंत्र्याशी शिष्टमंडळाची भेट या संदर्भातील बातम्या आणण्यासाठी पाठवत असे. पोंक्षे हा सिनिअर रिपोर्टर होता. बरीच वर्षे त्यांन अय्यर बरोबर काम केलं होतं. पोंक्षे हा अनुभवी पत्रकार आहे.

याशिवाय धीरू, शर्मा आणि साने हया पत्रकार व्यक्तिरेखा आहेत. धीरू व शर्मा हे मुंबईतील 'वेस्टर्न स्टार' या इंग्रजी दैनिकाचे वार्ताहर आहे. तो डे कॉलसाठी वार्तांकन करणारा आहे. तर साने हा मुंबईतील मराठी पेपरचा वार्ताहर आहे. तो पूर्वी एका पक्षाचा कार्यकर्ता होता. नंतर तो पत्रकार झाला आहे आणि राजकीय घटनांचे वार्तांकन करू लागला. साने हा कामगार नेता डि-कास्टाचा मित्र आहे.

**भय्यालाल भंडारी**

मुंबईतील इंग्रजी दैनिक 'वेस्टर्न स्टार' या वृत्तपत्राचा मालक आहे. तो काळा आहे. तो जाड असून त्याचा डोक्यावर एकही केस नाही. त्याचे डोळे दगडी असून नाक आणि त्याचा खालचा ओठ जाड आहे. तो नेहमी पांढरा शुभ्र खादीचा झब्बा आणि धोतर घालतो, त्यामुळे त्याचा काळेपणा उठून दिसतो. भंडारीला त्याचे सगळे नोकर लोक त्याच्या मागे बुड्ढा, सडका म्हातारा किंवा ओल्ड क्रूक असे म्हणतात.

अय्यर भय्यालाल भंडारी विषयी म्हणतो की, "खराब आदमी. आय हेट दॅट ओल्ड क्रूक मला त्याची कीव येते. त्याला पाहिलं की ओकारी येते. जीव द्यावासा वाटतो साऱ्या दुनियेतला क्रूकेडनेस आणि घाण त्याच्यात आहेसं वाटत. ही इज फिजिकली रिपल्सिव."[१७] भंडारीला वृत्तपत्रातील सर्व लोक घाबरून असतात. अय्यरच भंडारीबरोबर बोलण्याचे धाडस करत असे. अय्यरने दिलेली स्मगलिंगची बातमी भंडारीला आवडलेली नसते. त्यामुळे आपला पेपर ब्लॅक लिस्ट मध्ये जाईल याची भिती भंडारीला वाटते.

**न्यूज एडिटर**

वेस्टर्न स्टार या इंग्रजी वृत्तपत्राचा न्यूज एडिटर आहे. न्यूज एडिटर नेहमी ऑफीस मध्ये उशिरा येतो. अय्यरने दिलेल्या स्मगलिंगची बातमीने त्याचा चेहेरा पडलेला आहे. अय्यरने मुद्दाम न्यूज एडिटरला बातमी दाखविली नव्हती. न्यूज एडिटरला या बातमी विषयी तेरा फोन आले आहेत. त्यातील पहिला फोन मालकाचा होता. तो रागावला आहेत.

**५. 'मुंबई दिनांक' मधील इतर प्रातिनिधीक व्यक्तिरेखा**

'मुंबई दिनांक' मध्ये महानगरीय जीवनातील किशोर वझे, दयानंद पानिटकर, डी-कास्टा आणि जिवाजीराव शिंदे हया प्रातिनिधिक व्यक्तिरेखा आहेत.

**किशोर वझे**

किशोर वझे मुंबईतील सचिवालयात कारकून आहे. तो अविवाहित आहे. त्याचे नीला नावाच्या मुलीवर प्रेम आहे. त्याला सिगारेटचे व्यसन आहे. मुंबईतील सर्वसामान्य माणसाचे जीवन किशोर वझेच्या रूपाने या कादंबरीत अरुण सांधूनी साकारलेले आहे. तो मुंबईतल्या यंत्रवत जीवनाला कंटाळलेला. मुंबईतल्या गर्दीत त्याचा जीव घुसमटतो आहे. मनासारखे काहीच का घडत नाही? रोज रोज पराभवाची सकाळ

का उजाडते? सर्वत्र आपला पराभव का होतो? गेल्या पंधरा वर्षात एकतरी हसरी नाचरी सकाळ अनुभवली आहे का? हे त्याला दररोज पडणारे प्रश्न आहेत. पराभव, बुळेपणा, विकृती, वेदना हे शब्द त्याच्या तोंडी नेहमी येताना दिसतात. आपण जगायच्याच लायकीचे नाही आहोत याची सतत जाणीव त्याला झोंबत असते. यामुळे त्याचा मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला आहे. प्रेम प्रकरणात अपयश आल्यामुळे सिगारेट ओढण्याचे त्याचे प्रमाण वाढले. आपल्या शरीराचा, चेहऱ्याचा त्याला कधीही अभिमान नव्हता स्वत:च्या व्यक्तित्वाविषयी तो उदासीन होता. त्याला आपल्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता आपला हा संघर्ष मूक असून निराधार आहे. याची जाणीव त्याला होती. निराशा, वैफल्य, उदासिनता, एकटेपणा, तिरस्कार, तुच्छता या विकारांनी त्याला घेरला होता. सर्वसामान्य माणसाचं जीवन किती दु:खमय असते याची जाणीव किशोर वझेच्या मनोगतातून होते. हे या कादंबरीतून जाणवते. या मुंबई महानगरीत असे हजारो किशोर असे यातनामय, दु:खी, उदास जीवन जगत आहेत. अरुण साधूनी किशोर वझेच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाचे चित्रण केले आहे.

**दयानंद पानिटकर**

दयानंद पानिटकर हा मुळचा कुडाळ येथील असून वडील वारल्यामुळे मुंबई येथे कामासाठी आलेला हा युवक आहे. दयानंद हा धुण्या-भांडयाचे काम करता करता कापड गिरणीत काम करू लागला. पुढे कामगार युनियनचे काम करीत असताना पोलीसांनी पकडून त्याला आहे. दयानंदची नोकरी कायमस्वरूपी नव्हती. त्याने संपात भाग घेतला म्हणून त्याला कामावरून काढून टाकण्यात आले आहे. दयानंद हा जिद्दी होता. पुढे दयानंद मेथा शेठच्या पेट्रोल पंपावर काम करु लागला.

दयानंद पानिटकर गरीब मध्यम वर्गातील असून तो विवाहित आहे. त्याला सुनंदा नावाच पत्नी व एक मुलगी आहे. दयानंद हा महत्वाकांक्षी आहे. मेथा शेठच्या पेट्रोल

पंपावर काम करता करता त्या कंगाल अवस्थेत मेथा शेठच्या सोन्याच्या चोरटया आयातीच्या धंदयात मेथाचा हस्तक बनतो. दयानंदला पैशाचा मोह निर्माण होतो. त्यामुळे तो स्मगलिंगच्या धंद्यात उतरतो. दयानंद हळुहळु या धंदयात गुरफटत जातो. त्याला चांगले पैसे मिळतात. पैशाच्या जोरावर आलिशान फ्लॅट घेतो. मुलीला चांगल्या शाळेत पाठवतो. घरामध्ये तो भरपूर वस्तु आणतो. पत्नीला सोन्याचे दागिने करतो. दयानंदची पत्नी सुनंदाला आपला नवरा इतके पैसे कोठून आणतो याची भिती वाटते. ती याबद्दल दयानंदला विचारीत असते. पण दयानंद तिला काहीही सांगत नाही. दयानंदला स्मगलिंगच्या धंदयातून पैसे कमावून बाहेर पडू असे वाटत असते. दयानंदचे गावाकडे जाऊन दुकान टाकण्याचे स्वप्न असते. परंतु दयानंदला या धंदयातून बाहेर पडता येत नाही. अखेर या धंद्यातच त्याचा अंत होतो. अरुण साधूंनी अंत्यत विस्ताराने अवैध धंद्याची यंत्रणा व सर्वसामान्य माणसे पैशाच्या मोहाने या अवैध धंद्यात अडकतात व त्यातच त्यांचा अंत कसा होतो हे पानिटकरांच्या माध्यमातून चित्रण केले आहे.

**डी–कास्टा**

सेबेशीयन डी–कास्टा हा मुळचा गोव्यातील आहे. तो वयाच्या पंधराव्या वर्षी शाळेतून पळून मुंबईला आला होता. डी–कास्टा हा स्वतंत्र बुध्दीचा असून त्याला मुंबईतल्या अनेक भाषा बोलता येत आहेत. पोर्तुगीज व इंग्रजी भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या. त्याला उत्कृष्ठ इंग्रजी बोलता येत असे. डी–कास्टा लहान मोठी कामे करीत कामगार नेता झालेला आहे. कामगारांच्या हितासाठी चळवळ चालवायची असे त्याचे ध्येय होते. कास्टा काही वेळा कामगारांच्या प्रश्नांसाठी तुरूंगात गेला आहे. पोलीसांचा मारही घेतला आहे. त्याने युनियनच्या कामगारांच्या साह्याने अनेक मोहिमा हाती घेतल्या आहेत. स्वच्छता मोहिम, अधिक काम मोहिम, स्वावलंबन मोहिम, भ्रष्टाचार विरोधी मोहिम, स्मगलिंग विरोधी मोहिम इ. मोहिमा हाती घेउन तो काम करीत होता.

डी-कास्टाचे व्यक्तिमत्त्व रूबाबदार आहे. तो हुशार, तरूण आणि तडफदार कामगार नेता आहे. कास्टा हा अविवाहित आहे. त्याचे निला नावाच्या सेक्रेटरीवर प्रेम आहे. विनीता या मंत्र्याच्या मुलीचे डी-कास्टा वर प्रेम आहे. तिने त्याच्याशी लग्न करायचे ठरविले आहे. ती काही गुप्त बातम्या डी-कास्टाला पुरवित असते. डी-कास्टाने दिलेली स्मगलिंग विषयीची माहिती अय्यर 'वेस्टर्न स्टार' मध्ये छापतो. त्यामुळे खळबळ उडते. डी-कास्टाचा दरारा मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे यांनाही वाटतो. स्मगलर्स, काळा बाजारवाले त्याच्यावर जळत असतात. कामगार, टॅक्सी ड्रायव्हर अशा लोकांना डी-कास्ट आपला वाटतो. मुख्यमंत्री डी-कास्टला मंत्री पदाचे आमिष दाखवितात. डी-कास्टवर मेथा शेठचे गुंड हल्ला करतात परंतु तो त्यातून वाचतो.

**जिवाजीराव शिंदे**

जिवाजीराव शिंदे हे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे पूर्ण नाव जिवाजी लक्ष्मण शिंदे आहे. त्यानी मोठया जिद्दीने आपले कॉलेज पूर्ण केले आहे. कॉलेजमध्ये वक्तृत्वामध्ये नाव कमावले आहे. कॉलेजच्या निवडणूकाही त्यांनी लढविल्या आहेत. ते विवाहीत आहेत. सुरूवातीला त्यांनी सांगली येथे वकिली व्यवसाय केला आहे. ते करत असताना समाजकार्यात रस घेत होते. ते आपल्या वक्तृत्वाच्या बळावर लोकप्रिय झाले. पुढे ते जिल्हा बोर्ड, विधानसभा निवडून आले, मंत्री झाले आणि अखेर मुख्यमंत्रीही झाले, असा त्यांचा प्रवास आहे. मुख्यमंत्री हे गरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जात आहेत. मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्यात संघर्ष आहे. मुख्यमंत्री हे शिस्तप्रिय असून त्यांनी सरकारी यंत्रणेचा कल्पकतेने उपयोग केला आहे. मुख्यमंत्री हे दूरदृष्टी ठेवून वागणारे आहेत ते नेहमी पुढे जाण्याचाच प्रयत्न करतात. त्याचा सतत पाठपुरावा करतात. यामुळे ते लोकप्रिय आहेत. "द चीफ मिनिस्टर हू थिंक्स इन फ्यूचर"[१८] असे एका हुषार पाश्चात्य पत्रकाराने त्यांचे वर्णन केले आहे. मुख्यमंत्र्याच्या हातात राजकारणाची सर्व सूत्रे आहेत.

मुख्यमंत्र्यावर भ्रष्टाचाराचेही आरोप होत असतात. त्यामध्ये काही प्रमाणात तथ्य आहे. जिवाजीराव शिंदे यांच्या माध्यमातून अरुण साधूंनी राजकारणातील डावपेच मांडले आहेत.

'मुंबई दिनांक' या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केल्यानंतर आता कादंबरीचे विशेष थोडक्यात पाहू.

**६. 'मुंबई दिनांक' कादंबरीचे विशेष**

१. 'मुंबई दिनांक' मधून मुंबई शहराचे यथार्थ आणि वास्तव पातळीवरून दर्शन घडते.

२. या कादंबरीचा विषय, आशय, लेखनशैली, विविध व्यक्तिरेखा या बाबतीत इतर रूढ कादंबऱ्यांपेक्षा वेगळा आहे.

३. अरुण साधूंनी या कादंबरीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण अशी संमीश्र भाषाशैली वापरली आहे. बहुतेक इंग्रजीमिश्रीत मराठी अशी भाषा आहे.

४. अरुण साधू या कादंबरीतून विविध क्षेत्रातील व्यक्तिरेखांची निवड करून त्या प्रत्येक क्षेत्रातील वास्तवतेचे दर्शन घडविले आहे.

उदा. अ) अय्यर हा पत्रकारांच्या माध्यमातून वृत्तपत्रे, पत्रकारिता व वृत्तपत्रे सृष्टीतील इष्ट- अनिष्ट चित्रण केले आहे.

ब) दयानंद पानिटकर या तरूणाच्या माध्यमातून मुंबई हे स्मगलिंगचे केंद्र कसे बनले आहे याचे चित्रण केलेले आहे.

क) किशोर वझे या तरूणाच्या माध्यमातून मुंबईतील सर्वसामान्य माणसांच जीवन साकारलेले आहे.

ड) मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे यांच्या माध्यमातून राजकारणातील हेवेदावे, डावपेच व सत्ता स्पर्धा याचे सविस्तर दर्शन घडविले आहे.

५. अरुण साधू या कादंबरीतून मुंबईतील जनजीवनाच्या अंतरंगाचे, समाजाचे विस्तृत चित्रण केल्यामुळे ही कादंबरी सामाजिक कादंबरी वाटते.

६. या कादंबरीत तृतीय पुरूषी निवेदन पद्धतीचा वापर करून जे जसे आहे तसे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये कुठेही भडकपणा व कृत्रिमपणा नाही.

७. 'मुंबई दिनांक' या कादंबरीतून व्यक्त झालेले चित्र स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे असे वाटते.

८. 'मुंबई दिनांक' या कादंबरीला वृत्तपत्रीय शैलीचे व भाषेचे अंग असून ती वैचारीक पातळीवरून स्पष्ट होणारी आहे.

९. 'मुंबई दिनांक' या कादंबरीत नव्या तंत्राचा वापर केला असलातरी ही कादंबरी पारंपरिक वळणाची आहे असे वाटते.

१०. 'मुंबई दिनांक' ही अवघ्या एका दिवसाची कहाणी वाटते.

## ▪ समारोप

अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' ही १९७२ मध्ये प्रकाशित झालेली पहिली कादंबरी असून तिला पत्रकारितेचे अंग आहे. या कादंबरीतून मुंबई महानगरीचे वर्णन अरुण साधूंनी विविध प्रकारच्या व्यक्तिचित्रणातून केले आहे. महानगरीय जीवनातील सुख दु:खे ही मांडली आहेत. 'मुंबई दिनांक' ही राजकीय कादंबरी असून त्यामधून मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे व डी-कास्टा या व्यक्तिचित्रणातून राजकीय जीवनाचे अनेक तपशील मांडले आहेत. 'मुंबई दिंनांक' मध्ये राजकीय, सामाजिक घडामोडी व अवैध धंदे यांच्या संदर्भात पत्रकारितेच्या माध्यमातून चित्रण केले आहे. तसेच वृत्तपत्र व्यवसायाचे चित्रण केले आहे. पत्रकार व्यक्तिरेखा व पत्रकार अय्यरचे विशेष याची तपशीलवार माहिती घेतली आहे. वृत्तपत्रातील पत्रकारांच्या जगण्यातील सच्चेपणा,

खोटेपणा, मानसिक ताणतणाव, त्यांची प्रेरणा, मूड, उथळपणा, प्रदर्शनखोरपणा, त्यांची धावपळ, स्पर्धा व त्यांचा लंपटपणा याचे कधी थेट तर कधी उपरोधातून चित्रण केले आहे. तसेच इतर प्रतिनिधीक व्यक्तिरेखांचेही चित्रण केले आहे.

- **संदर्भग्रंथ सूची**


१. साधू, अरुण : 'मुंबई दिनांक', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, जाने २००७, पृ. ६७.

२. तत्रैव : पृ. ४४, ४५.

३. शोभणे, रवींद्र : अरुण साधू यांच्या राजकीय कादंबऱ्या, 'ललित', फेब्रु. २००७, पृ. ४५.

४. साधू, अरुण : 'मुंबई दिनांक', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, जाने २००७, पृ. ७८.

५. तत्रैव : पृ. १७

६. तत्रैव : पृ. २०

७. तत्रैव : पृ. १३८

८. तत्रैव : पृ. ४१, ४२

९. तत्रैव : पृ. ६

१०. तत्रैव : पृ. ११

११. तत्रैव : पृ. ६

१२. तत्रैव : पृ. ८

१३. तत्रैव : पृ. १३७

१४. तत्रैव : पृ. २०, २१.

१५. तत्रैव : पृ. २५

१६. तत्रैव : पृ. २२६

१७. तत्रैव : पृ. १७

१८. तत्रैव : पृ. १४७

# प्रकरण चौथे

# 'सिंहासन' कादंबरी मधील पत्रकारितेचे चित्रण

- प्रस्तावना

१. 'सिंहासन' – राजकीय कादंबरी

१.१ 'सिंहासन' मधील आशयसूत्रे : राजकारणाचे सर्वांगीण दर्शन.

२. 'सिंहासन' मधील राजकीय व सामाजिक घडामोडी, वृत्तपत्र यांच्या संदर्भातील पत्रकारितेचे चित्रण.

३. 'सिंहासन' मधील पत्रकार व्यक्तिरेखा.

३.१ 'सिंहासन' मधील पत्रकार दिगूचे विशेष

४. 'सिंहासन' मधील इतर प्रातिनिधिक व्यक्तिरेखा

५. 'सिंहासन' या कादंबरीचे विशेष.

- समारोप